# BDC LIBRARY
## New Paper Clipping
### A.Y. 2024-2025

# शैक्षणिक धोरणाविरोधात उद्या मेळाव्याचे आयोजन

## शासनाच्या चुकीच्या धोरंणावर होणार चर्चा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पाटण :** शिक्षण व्यवस्थेविषयी राज्य शासनाच्या नकारात्मक, उदासीन धोरणांमुळे शिक्षण व्यवस्था उद्ध्वस्त होत आहे. शासनाच्या प्राथमिक, माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षणाविषयीच्या उदासीन धोरणाच्या विरोधात आता समाजानेच लढा उभारण्याची गरज आहे. शासनाच्या चुकीच्या धोरणाविरोधात गांभीर्याने विचार करण्यासाठी शनिवार, दि. ३ रोजी दुपारी साडेबारा वाजता येथील कोयना एज्युकेशन सोसायटीच्या डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम सभागृहात मेळाव्याचे आयोजन केले आहे, अशी माहिती कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर यांनी दिली.

देशात शैक्षणिकदृष्ट्या प्रगत तसेच देशाला दिशा देणाऱ्या पुरोगामी महाराष्ट्रात शिक्षण व्यवस्थेविषयीची शासनस्तरावरील अनास्थेचे दुरगामी गंभीर परिणाम समाजाला भोगावे लागत आहेत.

या पार्श्वभूमीवर होणाऱ्या या मेळाव्यास संस्था चालक संघटनेचे अशोकराव थोरात, सचिव सुकरे, मुख्याध्यापक संघटनेचे सचिन नलावडे, शिक्षक संघटनेचे पदाधिकारी, शिक्षकेतर संघटनेचे पदाधिकारी मार्गदर्शन करणार आहेत. सातारा जिल्ह्यात शिक्षण क्षेत्रात काम करत असलेल्या सर्व घटकांनी या मेळाव्यास उपस्थित राहावे, असे आवाहन अमरसिंह पाटणकर यांनी केले केले.